# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/01/2022 (सोमवार)

(दुपार)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत 01 कि.मी अंतरावरील पंजाब नॅशनल बॅकेच्या समोरच्या आवारात जवाहर नगर कन्हान येथे दिनांक 08/01/2022 चे 20.30 वा. ते 20.50 वा. दरम्यान फिर्यादी नामे— आशिष विजयसिंग ठाकुर वय 24 वर्ष रा. गणेश नगर, कन्हान हा आपल्या मित्रासह बसला असता विधीसंघर्ष बालक वय 16 वर्ष याने फिर्यादीस म्हटले की, 'तु ज्यादा बात कर रहा है क्या'? असे बोलुन जुन्या पैशाच्या वादाच्या कारणावरून फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ केली. यानंतर आरोपीने स्वता: जवळील कोणत्यातरी धारदार वस्तुने उजव्या हाताच्या दंडावर तसेच फिर्यादीस जिवे ठार मारण्याची उद्देशाने फिर्यादीचे गळयावर वार करून फिर्यादीस गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 294, 307 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सतिश मेश्राम मो.क्र. 9923798688 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील बाबदेव मौदा येथे दिनांक 08/01/2022 चे 06.30 वा. ते दिनांक 09/01/2022 चे 04.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिलीप गजानन शिंगणापुरे, वय 62 वर्ष, रा. बाबदेव याने त्याचा पानठेला बंद करून आपल्या घरी परत गेला. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे पानठेलाचे कुलुप तोडुन त्यामध्ये ठेवलेले 2 स्टीलच्या शेगडया कि. 2,000/—रू. व 1 गैस सिलेंडर कि. 1,000/—रू. तसेच इंवरटर कि. 1,000/—रू. एकुण 4,000/—रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 461 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संजय देशमुख मो.क्र. 9552556865 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर